## लवाद दावा क्र. ८/२०२६ मधील नि. ५ वरील आदेश
## पेडगाव विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या. वि. श्री सुभाष हौसराव दळवी व इतर

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी २ यांच्या अर्जात नमूद केलेल्या मिळकती ह्या प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो कोणासही परस्पर विक्री करू नये, तसेच तारण, गहाण व दान अथवा बक्षीस या मार्गाने हस्तांतरित करू नये अथवा त्यावर कोणाचाही कोणताही हक्क किंवा बोजा निर्माण करू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकमासाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी २ यांच्या मालकीची मौजे अनगरे, ता. श्रागोंदा, जि.अ.नगर गट नं.६५ चे क्षेत्र ०.९९.०० हे. आर ही मिळकत तसेच मौजे पेडगाव, ता. श्रागोंदा, जि.अ.नगर गट नं. ४६७ चे क्षेत्र १.४०.०० हे. आर ही मिळकत प्रतिवादी २ हे विक्री करण्याची किंवा इतर लोकांच्या हक्कात सदर मिळकतीची खरेदीखत, गहाणखत अथवा इतर मार्गाने विल्हेवाट लावण्याची शक्यता आहे. प्रतिवादी यांनी स्थावर मिळकती इतरांच्या नावे हस्तांतरित केल्यास वादी यांना प्रतिवादी यांचेकडून येणे असलेले रकमेची वसुली करता येणे शक्य होणार नाही. सबब, वादी संस्थेने प्रस्तुतचा अर्ज वर नमूद मिळकती ह्या प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो कोणासही परस्पर विक्री करू नये तसेच तारण, गहाण व दान अथवा बक्षीस या मार्गाने हस्तांतरित करू नये अथवा त्यावर कोणाचाही कोणताही हक्क किंवा बोजा निर्माण करू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकमासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी २ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

३) वादीच्या कथनानुसार खालील मुद्दे काढण्यात आले. त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसासह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.नं. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे तुर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्यास हक्कदार आहेत काय ? | होय |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता :–**

४) वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा दावा व अर्जाचे अवलोकन केले. दाव्याचे अवलोकन करता वादीने प्रतिवादी २ विरूध्द तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यात यावा अशी विनंती केली आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी १ व २ यांचे विरुद्ध अपहारीत रक्कम रुपये ४३,३४,०६५/– वसूल होऊन मिळण्याकरता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार,मौजे अनगरे, ता. श्रागोंदा, जि.अ.नगर गट नं.६५ चे क्षेत्र ०.९९.०० हे. आर ही मिळकत तसेच मौजे पेडगाव, ता. श्रागोंदा, जि.अ.नगर गट नं. ४६७ चे क्षेत्र १.४०.०० हे. आर ह्या मिळकती प्रतिवादी २ यांच्या नावे आहेत.

५) वादीने सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ नि. ४/५ वर प्रतिवादी यांच्या नावे अर्जात नमूद केलेल्या मिळकतीबाबत सातबारा उतारा तसेच गाव नमुना आठ अ दाखल केलेला आहे. सदर सातबारा उतारा व गाव नमुना आठ अ चे अवलोकन करता सदर मिळकती प्रतिवादी २ यांच्या नावे असल्याचे दिसून येते. वादीच्या कथनानुसार सदर मिळकती ह्या प्रतिवादी २ हे विक्री करण्याची किंवा इतर लोकांच्या हक्कात सदर मिळकतीची खरेदीखत, गहाणखत अथवा इतर मार्गाने विल्हेवाट लावण्याची शक्यता आहे. वादीचे कथन असेही आहे की प्रतिवादी यांनी स्थावर मिळकती इतरांची नावे हस्तांतरित केल्यास वादी यांना प्रतिवादी यांचेकडून येणे असलेले रकमेची वसुली करता येणे शक्य होणार नाही.

६) प्रस्तुत अर्जाला प्रतिवादी २ यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे वादीची अर्जातील कथने अबाधित राहिलेली आहेत. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी १ व २ यांचे विरुद्ध अपहारीत रक्कम रुपये ४३,३४,०६५/– वसूल होऊन मिळण्याकरता दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत, दाव्यांची विविधता टाळण्यासाठी, या टप्प्यावर वादीला प्रतिवादी २ यांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबत अंतरिम दिलासा देणे न्यायोचित ठरेल अन्यथा, दावा दाखल करण्याचा उद्देशच निष्फळ ठरेल. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर वरीलप्रमाणे देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

७) वर चर्चा केल्यावरुन वादीस सकृत दर्शनी केस आहे.न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. त्यामुळे मुद्दे क्र.१ करीता मी वरीलप्रमाणे उत्तर देवून, मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी २ यांनी अर्जात नमूद केलेल्या मिळकती ह्या प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो कोणासही परस्पर विक्री करू नये. तसेच तारण, गहाण व दान अथवा बक्षीस या मार्गाने हस्तांतरित करू नये अथवा त्यावर कोणताही हक्क किंवा बोजा निर्माण करू नये.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही

दिनांक १८/०७/२०२६

(म. प्र. जसवंत)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय अहमदनगर.